**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९३२/०२**

**श्री.नामदेव संतोष वाघ,**
**एन.के.टी.कॉलेज, कोर्टनाका,**
**ठाणे.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा राज्यपालांचे सह सचिव (शिक्षण)**
**राज्यपालांचे सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५**

**जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**राज्यपालांचे सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

श्री.नामदेव संतोष वाघ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०७.२००८ रोजी अर्ज करुन मा.राज्यपाल यांना दि.२१.१०.२००२ रोजी पाठविलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलार्थीचे म्हणने ऐकून घेण्यात आले. अपिलकाराचे दि.२१.१०.२००२ चे पत्र किंवा त्यासंबंधीची कागदपत्र शोधूनही सापडली नाहीत. अपिलकाराने सादर केलेल्या दि.२१.१०.२००२ च्या पत्राच्या प्रतीवरुन कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने अपिलकाराच्या दि.२१.१०.२००२ च्या पत्राची प्रत कुलगुरु, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व कुलगुर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्याकरिता दोन स्वतंत्र पत्र तयार करण्यात आली. सदर पत्र दि.२९.०९.२००८

रोजी निर्गमित करण्यात आली. दोन्ही पत्राच्या प्रती अपिलकारास देण्यात आल्या. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२८.०७.२००८ रोजी अर्ज करुन त्यांनी दि.२१.१०.२००२ रोजी राज्यपाल कार्यालयास पाठविलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अपीलकाराचे निवेदनाचा जन माहिती अधिका-यांनी शोध घेतला असता कागदपत्र उपलब्ध झाली नाहीत, म्हणून अपीलकरास विहित कालावधीत माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकाराने सादर केलेले दि.२१.१०.२००२ चे निवेदनावर कार्यवाही करण्याचे प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी ठरविण्यात आले. त्यानुसार अपीलकाराच्या दि.२१.१०.२००२ च्या निवेदनाच्या प्रती कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे पुढील योग्यत्या कार्यवाहीकरिता दि.२९.०९.२००८ रोजी दोन स्वतंत्र पत्रान्वये पाठविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. तसेच सदर दोन्ही पत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.०९.२००८ रोजी दिल्या आहेत. यावरुन जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही करुन अपीलार्थीला माहिती दिली आहे. पुढील आवश्यक माहितीकरिता अपीलकाराने संबंधीत विद्यापीठातील सक्षम प्राधिका-यांकडे संपर्क साधने आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १८.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९३४/०२**

**श्री.निपुन मठकर**
**बी-५, जीवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजय नगर,**
**नाला सोपारा (पू), ठाणे ४०१ २०८.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**६ वा मजला, सामान्य प्रशासन विभाग,**
**महानगरपालिका, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**६ वा मजला, सामान्य प्रशासन विभाग,**
**महानगरपालिका, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.निपूण मटकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचा-यांची एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवरीनुसार भरलेली परे इत्यादीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या अर्जाची प्रत सर्वसंबंधीत जन माहिती अधिका-यांना दि.१४.०८.२००८ च्या पत्रान्वये पाठविली कारण मुंबई महानगरपालिकेमध्ये सरळ सेवा भरती एकाच खात्याकडून केली जात नाही. त्यासंबंधी माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी अनेक आहेत असे जन माहिती आधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. सरळ सेवा भर्तीबाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.०४.०९.२००८ च्या पत्रान्वये निदेश दिले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एकूण मंजूर अधिकारी / कर्मचा-यांची पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता भरलेली पदे, वर्गवारीनुसार पद संख्या इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सरळ सेवा भरती एकाच खात्याकडून केली जात नाही. म्हणून अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज सर्व संबंधीत जन माहिती अधिका-याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविला व तसे अपीलकारास कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्र.) यांनी त्यांच्या खात्यासंबंधीची पदाबाबतची अनुषंगीक माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २५.०३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९७६/०२**

**श्री.मालगावकर भूषण पांडूरंग**
**१२२/३०२, मुकेश अपार्टमेंट,**
**नाडकरणी मार्ग, वडाळा (पू)**
**मुंबई ४०० ०३७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक**
**मुंबई विद्यापीठ, फोर्ट,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक,**
**मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,**
**मुंबई ४०० ०९८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.निपूण मटकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०८.२००८ रोजी अर्ज करून तपासणी केलेल्या उत्तरपत्रिबाबत विद्यार्थ्याचे गा-हाणे असेल तर ते दूर करण्याकरिता उत्तरपत्रिकाची पुर्नतपासणी करणे, उत्तरपत्रिकाच्या छायाप्रती देणेबाबत नियम कार्यपध्दतीबाबत दि.१७.११.२००४ नंतर प्रसिध्द करण्यात आलेल्या नवीन आद्योदशाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२६.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकू न घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन उत्तरपत्रिकाची पुर्नतपासणी, उत्तरपत्रिकाच्या छायाप्रती मिळण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या आद्यादेशाची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चित योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.  अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २५.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८९५/०२**

**श्री.निखिल जयंतीलाल गांधी**
**१८५ अे-श्रीशिवम को.ऑप.हौ.सो.लि,**
**फ्लॅट नं.अे-७, तिसरा मजला, एस.व्ही.रोड,**
**विले पार्ले (प), मुंबई ४०० ०५८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक (३)**
**सहकारी संस्था (३), मुंबई यांचे कार्यालय,**
**गृह निर्माण भवन, तळ मजला,**
**कक्ष क्र.६९, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक,**
**सहकारी संस्था (३), मुंबई यांचे कार्यालय,**
**गृह निर्माण भवन, तळ मजला,**
**कक्ष क्र.६९, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.निखिल गांधी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०८.२००८ रोजी अर्ज करुन दि.०१.०४.२००७ ते दि.३१.०३.२००८ पर्यंतच्या कालावधीत जन माहिती अधिका-याच्या कार्यक्षेत्रातील किती सहकारी गृहनिर्माण संस्थावर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली होती याबाबत अनुषंगीक ४ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०८.२००८ च्या पत्रान्वये विलंबाने मुद्येनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली. अपीलकाराच्या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेचेनाव जन माहिती अधिका-याने दिलेल्या यादीत नाही. अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली

नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.१२.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी. प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने सहकारी गृहनिर्माण संस्थावर दि.०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीत प्रशासक नेमणूक केलेल्या संस्थाबाबत एकूण ४ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०८.२००८ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती दिली.  सदर माहिती अपूर्ण असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.  अपीलकाराच्या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक झाली आहे.  परंतू सदर संस्थेचे नाव जन माहिती अधिका-याने दिलेल्या यादीत समाविष्ठ नसल्याचे अपीलकाराने सिध्द केले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अपूर्ण माहिती दिली असल्याचे दिसून येते.  जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्यास आवश्यकती माहिती प्राप्त करून घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते.  परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत.  अपीलकारास माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत.  यामुळे समाधान झाले नाही तर अपीलकारास राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधीत राहील.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २५.०३.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८६४/०२**

**श्री.कवडू जनार्दन येनप्रेड्डीवार**
**अध्यक्ष, मूल तालूका युवक बिरादरी संघटना,**
**रा.शांतीनगर, वॉर्ड नं.८, कृषी बाजार रोड मूल,**
**ता.मूल, जि.चंद्रपूर ४४१ २२४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.कवडू येनप्रेड्डीवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०५.२००७ रोजी अर्ज करुन महाराष्ट्रातील अतिक्रमण धारक पात्र व अपात्र लोकांना जमिनीचे स्थायी पदे देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०७.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जी माहिती पाहिजे होती ती माहिती मुदतीत दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.१५.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२१.०२.२००९ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयात कॉन्फरसींग रुममध्ये सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकार श्री.कवडू येनप्रेड़डीवार यांनी जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाराष्ट्रातील वन जमिनीवरील अतिक्रमणदारांची पात्रता तपासून लोकांना जमीनीचे स्थायी पदे देणेबाबत माहिती मागीतली होती. वन जमीनीवरील अतिक्रमणदारांची पात्रता तपासण्याकरिता शासनाच्या दि.१०.१०.२००२ च्या निर्णयानुसार स्थापित केलेल्या गाव व तालुका पातळीवरील समित्यांच्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय आयुक्त, नागपूर यांनी वन विभागाला सादर केला आहे. तथापि केंद्र शासनाच्या दि.०३.११.२००५ च्या मार्गदर्शक तत्वानुसार वन जमिनीवरील अतिक्रमणदारांची पात्रता तपासण्याकरिता गाव, तालुका व जिल्हा पातळीवर समित्या नेमण्याचा धोणात्मक निर्णय शासनाने दि.२३०४.२००७ अन्वये घेतला आहे. त्यानुसार पुन्हा नव्याने प्रकरणे तपासण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, वन जमीनीवरील अतिक्रमणाची प्रकरणे नव्याने तपासण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार काय कारवाई करण्यात आली. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अद्यावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २५.०३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८०४/०२**

**श्री.शरद दिनकरराव पाचखेडे**
**तिर्थरूप नगर, राधास्वामी मंदिराजवळ,**
**तुकुम नं.२, चंद्रपूर. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.शरद पाचखेडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०३.२००७ रोजी अर्ज करुन श्री.जे.डी.दराडे मुख्य अभियंता यांचे चौकशी अहवालातील मुध्दा क्रमांक ४ नुसार कारवाई न करता प्रकरण बंद करण्याचा निर्णय कोणत्या अधिका-याने घेतला त्याचे नाव, त्यांनी फाईलवर लिहिलेल्या शे-याची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयात व्हीडीओ कॉन्फरसींग रूममध्ये दि.२०.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२०.०३.२००७ रोजी अर्ज करुन श्री.जे.डी.दराडे, मुख्य खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या अहवालातील मुध्दा क्र.४ अनुसार कारवाईची मागणी अपीलकाराने केली. तथापि श्री.दराडे यांनी श्री.रामटेके हे दोषी असल्याचे नमुद केलेले नाही. तर खात्यामार्फत स्वतंत्र चौकशी आवश्यक वाटते असे नमुद केले आहे. श्री.दराडे यांच्या अहवालानुसार श्री.सुरेश रामटेके, भांडारपाल यांच्याविरुध्द उप संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नागपूर यांच्याकडून विभागीय चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये श्री.रामटेके यांच्याविरुध्द दोषारोप सिध्द होत नसल्याचे उप संचालकांनी कळविले श्री.रामटेके हे सेवानिवृत्त प्रकरण अंतीमत: बंद करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी वि.स.स. यांना कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणाची वस्तुस्थिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन दिली नसल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते तरी जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २५.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१९/०२**

**श्री.सुरेश गावडे, श्री.अनिल थरथरे व श्री.जयंतीलाल शहा,**
**जयंत प्रोव्हीजन स्टोर्स, शॉप नं.९,**
**अराम शॉपिंग सेंटर, संत ज्ञानेश्वर मार्ग,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पूर्व, १३७ टीपीएस-५,**
**दुसरा रोड, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पूर्व, १३७ टीपीएस-५,**
**दुसरा रोड, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार सर्व श्री.सुरेश गावडे, अनिल थरथरे व जयंतीलाल शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०१.२००८ रोजी अर्ज करून संत ज्ञानेश्वर मार्ग, सीटीएस-६२९, बांद्रा (पू), मुंबई येथील शास्त्रीनगर महानगरपालिका मार्केटबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.०३.०३.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची / अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलवर दि.०३.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी जन माहिती अधिका-याबरोबर

सविस्तरपणे चर्चा केली. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगीतले की, त्याकाळी अपीलकाराने मागीतलेली कागदपत्र त्यांचेकडे नव्हती. परंतू अपीलकार आता अपीलकारास माहिती देउ शकतात. या परिस्थितीत अपीलकारास ७ दिवसाचे आत माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नसल्याने अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२५.०१.२००८ रोजी अर्ज करुन शास्त्रीनगर महानगरपालिका मार्केटबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अपूर्ण माहिती दिली. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती देउ शकतो असे जन माहिती अधिकारी श्री.साळवी यांनी प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी कबूल केले होते. त्यानुसार ७ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.१५.०७.२००८ च्या पत्रान्वये सूचना दिल्या. परंतू जन माहिती अधिका-यांनी कबूल केल्यानुसार अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**<u>आदेश</u>**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०३.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८२४/०२**

**श्री.अनिल वेदव्यास गलगली**
**२, जुना खारवाला चाळ, काजुपाडा,**
**साकीनाका, मुंबई ४०० ०७२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अनिल वेदव्यास गलगली यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.११.२००७ रोजी अर्ज करुन स्टेशन परिसर वाहतुक सुधार योजनेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२६.११.२००७ रोजी अर्ज करुन स्टेशन परिसर वाहतुक सुधार योजनेबाबत एकूण ७ मुद्यावर माहिती

मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोजित केली नाही.  अपीलकारास माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक २६.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०८६/०२**

**श्री.आर.एल.लौंगानी**
**६, फाउंटन हेड सहकारी संस्था,**
**१३३, एस.व्ही.रोड, खार, मुंबई ४०० ०५२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम वॉर्ड कार्यालय इमारत,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम वॉर्ड कार्यालय इमारत,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.आर.एल.लौंगानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०८.२००८ रोजी अर्ज करुन फाउंटन हेड सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेच्या इमारतीत सदनिका क्र.१, २, ३, ४, ५, ७, ८ व ९ मध्ये अनधीकृतरित्या बांधकाम / फेरफार करुन इमारत करुन इमारत कमकुवत बनल्याबाबत, अपीलकाराच्या सदनीकेतील गळतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१०.११.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. दरम्यानच्या कालावधीत जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर

दि.१८.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकारा हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२७.०८.२००८ रोजी अर्ज करुन फाउंटन हेड सहकारी गृहनिर्माण संस्थेत अनधीकृतरित्या फेरबदल / बांधकाम करुन विशिष्ट सदनिकाधारकांनी इमारत कमकुवत केल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधी उलटून गेल्यानंतर उशिराने माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-यांने अपूर्ण दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत फाईल / कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत फाईलचे निरीक्षण करावे त्यांनतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने अपूर्ण माहिती दिल्याबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती का लादण्यात येउ नये याबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आयोगात समक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०९३/०२**

**श्री.शकील हसन पटणी**
**२०१, मधु कम्पांउंड, सेनावाला क्रॉस रोड नं.२,**
**यादव ट्रान्सपोर्ट जवळ, गोरेगांव (पू),**
**मुंबई ४०० ०६३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम वॉर्ड कार्यालय इमारत,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम वॉर्ड कार्यालय इमारत,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.शकील हसन पटणी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०९.२००८ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.६६, ६६/१ ते ५१ अंधेरी येथील आशीयांना सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.०४.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले की, कार्यालयात माहिती उलब्ध नाही. टेबल सर्व्हे सीटी सर्व्हे ऑफीसकडून घ्यावे. अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१९.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन आशीयांना सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराने मागीतलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.  माहितीकरिता सीटी सर्व्हे कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते.  मागणीप्रमाणे आवश्यक माहिती जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनिमातील अपीलकारास एक संधी उपलब्ध आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८२८/०२**

**श्री.विलास आ.साळवे**
**रू.१८, साईलिला सदन चाळ,**
**साईमंदिराजवळ, हनुमान गल्ली,**
**कांजूरमार्ग, मुंबई ४०० ०७८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.विलास आसाराम साळवे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२००८ रोजी अर्ज करून ज्ञानराज माध्यमिक विद्यालय, शास्त्रीनगर, कासारवाडी, पुणे हे विद्यालय स्थापन झाल्यापासून विद्यालयास सन २००८ पर्यंत किती अनुदान मिळाले इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१५.०४.२००८ रोजी अर्ज करुन ज्ञानराज माध्यमिक विद्यालय स्थापन झाल्यापासून विद्यालयास सन २००८ पर्यंत किती अनुदान मिळाले याबाबत अनुषंगीक एकूण ११ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१७९४/०२**

**डॉ.प्रतिभा जयंत काणेकर**
**९ बी-१०३, अशोक नगर, बाळकुम,**
**ठाणे (प), ४०० ६०८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह-संचालक,**
**उच्च शिक्षण मुंबई विभाग,**
**३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च शिक्षण मुंबई विभाग,**
**३ महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार डॉ.प्रतिभा जयंत कणेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००८ रोजी अर्ज करुन मुंबई विभागांतर्गत अनदानित / विना अनुदानित खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी / अधिकारी यांच्या निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी अंतीम प्रदाने याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.०९.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००८ रोजी अर्ज करुन मुंबई विभागातील अनुदानीत / विना अनुदानीत, खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी यांच्या निवृत्तीवेतन व भविष्यनिर्वाह निधी अंतीम प्रदाने करण्यासंबंधीची अनुषंगीक माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मुध्देनिहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८२६/०२**

**श्री.सिरील पीटर डिसोझा**
**गुडलक चाळ, रुम नं.१८,**
**साई संकल्प बिल्डींगजवळ,**
**बी एम सी कॉलनी समोर,**
**मालवणी ब्लॉक क्र.३,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. सिरील डिसोझा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०५.२००८ रोजी अर्ज करून कस्तूर पार्क रोड बोरीवली (प) मुंबई येथील मेसर्स सत्रा विकासक यांनी ड्रीम शॉपींग मालच्या केलेल्या कामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल

केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.२१.११.२००७ रोजी अर्ज करुन ड्रीममॉल, मेसर्स सत्रा विकासक, कस्तूर पार्क, बोरीवली (प) यांचेबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**<u>आदेश</u>**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८२५/०२**

**श्री.चेतन कोठारी**
**५२, ओसीआनीक अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबाली पटेल लेन,**
**बी देसाई रोड, मुंबई ४०० ०२६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सुप्रिंटेंडेन्ट**
**सेंट जार्ज हॉस्पीटल,**
**व्ही.टी.स्टेशन जवळ,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक**
**सेंट जार्ज हॉस्पीटल,**
**व्ही.टी.स्टेशन जवळ,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. चेतन कोठारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०५.२००८ रोजी अर्ज करुन गेल्या ३ वर्षात विविध आजाराने दाखल झालेल्या व मृत पावलेल्या रुग्णाची माहिती तसेच इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१६.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यानच्या कालावधीत अर्जातील मुध्दा क्र.ए व बी ची माहिती अपीलकारास दि.०६.०८.२००८ च्या पत्रान्वये त्यानंतर अर्जातील मुध्दा क्र.सी ते एच बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दि.२६.०८.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे अपीलातील कादपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०५.२००८ रोजी अर्ज करुन विविध आजाराने दाखल केलेल्या व मृत्यू पावलेल्या रुग्णाची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. दरम्यान अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र. ऐ ते एच मुद्याबाबत माहिती दिली. परंतू जन माहिती अधिका-यांनी दिलेली सदर माहिती अपूर्ण असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याच्यादृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची उक्त अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. पंरतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपिलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९५५/०२**

**श्री.यू.सी.संकलेचा**
**फ्लॅट नं.५१, पुर्णीमा को.ऑप.हौ.सोसा,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक**
**महाराष्ट्र को.ऑप.हौ.सोसा,**
**मल्होत्रा हाउस, जी.पी.ओ. समारे,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (ऐ वॉर्ड)**
**महाराष्ट्र को.ऑप.हौ.सोसा,**
**मल्होत्रा हाउस, जी.पी.ओ. समारे,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.यू.सी.संकलेचा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०६.२००८ रोजी अर्ज करुन पुर्णीमा सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेने दिलेल्या बनावट भोगवटा प्रमाणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.३१.०७.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०८.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१३.०६.२००८ रोजी अर्ज करुन पुर्णीमा सहकारी गृहनिर्माण संस्थेने बनावट भोगवटा प्रमाणपत्र बनविल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहित दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०८.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपीलकार संस्थेचे सभासद असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ३२ नुसार अपीलकाराने हवी असलेली माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलातील कागदपत्राची तपासणी केली असता अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याची खात्री होत नाही. अपीलकारास दि.११.०७.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली होती. अपीलकार संस्थेचे सभासद असल्याचे माहिती संस्थेकडून घ्यावी असे उत्तर उपनिबंधक सहकारी संस्था अे विभाग मुंबई यांनी दि.१२.०८.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०४६/०२**

**श्री.लेस्ली अल्मेडा**
**कासा अल्मेडा, फ्लॅट नं.१०३,**
**१ सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड समोर,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विभागीय जिल्हा निबंधक सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा इमारत,**
**तळ मजला, रू.नं.६९, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**एच/वेस्ट वॉड, सहकार बाजार इमारत,**
**४ था मजला, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.लेस्ली अल्मेडा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०७.२००८ रोजी अर्ज करून सॅलसेट कॅथलिक सहकारी गृहनिर्माण संस्था लि.बांद्रा (प), मुंबई या संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरवावी असे दि.१७.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यांनतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती

दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१२.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०३.०७.२००८ रोजी अर्ज करुन सॅलसेट कॅथलिक सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश देउनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही.  जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.  अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२१०३/०२**

**श्री.एम.व्ही.रुपारेलिया**
**अे-५०३, रश्मी उत्सव,**
**जंगीद इस्टेट आणि विजय पार्क जवळ,**
**मिरारोड (पू), जि.ठाणे ४०१ १०७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, विस्तार भवन,**
**मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, विस्तार भवन,**
**मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.एम.व्ही.रुपारेलिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०५.२००८ रोजी अर्ज करुन जेष्ठ नागरिकांच्या कल्याणकारी योजनाबाबत माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत माहिती दिली. अर्जातील इतर मुद्याची माहिती इतर विभाग / कार्यासनाशी संबंधीत असल्याने अर्जाची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता संबंधीताकडे हस्तांतरित करण्यात आले असल्याचे अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०८.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१९.०३.२००९

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१५.०५.२००८ रोजी अर्ज करून जेष्ठ नागरीकासाठी शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अर्जातील मुध्दा क्र.१ अनुसार महाराष्ट्र जेष्ठ नागरीक धोरण-२००५ (भाग-१) शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. जेष्ठ नागरीक धोरण भाग-२ (आर्थीक बाबी संदर्भात) तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून (साध्या व निआराम) प्रवास करणा-या वरिष्ठ नागरीकांना प्रवास भाडयामध्ये ५०% सवलत दिली जाते. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजनेबाबत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्राची प्रत, निवृत्ती वेतनासाठी करावयाच्या अर्जाबाबतचा शासन निर्णय अपीलकारास अनुक्रमे दि.११.०७.२००८ व दि.१७.०७.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविण्यात आल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतू अपूर्ण माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. मागीतलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करण्यात आली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करावी व आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर अपीलकारास राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०९४/०२**

**श्री.मोहम्मद इसाक अन्सारी**
**२०१, मधु कंम्पाउंड,**
**सोनावाला क्रॉस रोड नं.२,**
**गोरेगांव (पू), मुंबई ४०० ०६३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**मुख्यालय, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.मोहम्मद अन्सारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०९.२००८ रोजी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत शिधापत्रिका, दुकानाचे लायसन्स संस्थेने बोगस कागदपत्र सादर करुन परिशिष्ट-२ मध्ये गाळेधारकाचा समावेश केला आहे. सदर परिशिष्ट-२ रद्द करण्याकरिता कोणत्या सक्षम प्राधिकरणामध्ये संपर्क साधावा इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०२.०६.२००८ रोजी अर्ज करुन भगवती सहकारी गृहनिर्माण संस्थेचा कारभार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अनुसार चालत नसल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची अधिनियमात अपीलकारास एक संधी आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१४६१/०२**

**श्री.आनंद सोपान पारगावकर**
**रूम नं.११४५, फुले नगर,**
**आय.आय.टी. मार्केट, पवई,**
**मुंबई ४०० ०७६.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड इमारत,**
**भांडून (प), मुंबई ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस वॉर्ड इमारत,**
**भांडून (प), मुंबई ४०० ०७८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.आनंद पारगावकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०५.२००८ रोजी अर्ज करुन हिरानंदानी कॉम्प्लेक्सची अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०७.०५.२००८ रोजी अर्ज करुन हिरानंदानी कॉम्प्लेक्सबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.०३.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१४/०२**

**श्री.सुरेश केशव ढावरे**
**उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (आस्थापना)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुरेश ढावरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०६.२००८ रोजी अर्ज करुन श्री.ढावरे, उप सचिव यांना संवेदनशिल कामे देउ नये असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आयोगास कळविलेल्या पत्राची प्रत, श्रीमती सुराणा यांच्या प्रकरणातील जबाबदार अधिका-यांना दिलेल्या दोषारोपाच्या प्रती, त्यावरील खुलाशाची प्रत, संबंधीत अधिका-यांनी केलेल्या खुलाशावर ज्या निष्कर्षाच्या आधारे विभागीय चौकशी बंद करण्याचे आदेश घेतले त्या अनुषंगाने सादर केलेल्या टिप्पणीची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६ जुर्ले, २००८ रोजी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली काही मुद्याबाबतची माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०७.२००८ रोजी प्रथम

अपील दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.  सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.  अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-योच म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्रातील तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील अधिका-यांना दिलेल्या दोषारोपाची प्रत, त्यावर अधिका-यांनी दिलेल्या खुलाशाची प्रत, ज्या निष्कर्षाच्या आधारे संबंधीत अधिका-यांची विभागीय चौकशी बंद करण्यात आली त्यासंबंधीच्या कागदपत्र / टिप्पणीच्या प्रती एकूण १६ मुद्यांवर इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती.  दि.१६ जुर्ले, २००८ च्या पत्रान्वये अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.१, ४, ५, ९, १०, ११, व १५ बाबत माहिती दिली.  मुध्दा क्र.२, ३, ३, ६, ७, ८, १२, १३ व १६ या मुद्याची माहिती उपलब्ध नसल्याने पुरविण्यात आलेली नाही.  दि.१८ जुले, २००८ च्या पत्रानुसार अर्जातील मुध्दा क्र.१, २, ४, ५ व ६ संदर्भात माहिती पुरविण्यात आली.  अर्जातील मुध्दा क्र.३ बाबत माहिती उपलब्ध नसल्याने देण्यात आली नाही. तसेच मुध्दा क्र.७ व ८ बाबत भाष्य करण्यात आले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले.  यावरुन अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.३, ७, ८, १२, १३, १४ व १६ याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिलेली नाही.  सदर मुद्याची माहिती उपलब्ध नाही, प्रस्तूत अधिनियमाव्दारे विशिष्ट मुद्यानुसार भाष्य करणे अभिप्रेत नाही असे कारणे नमुद करुन अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती दिलेली नाही.  जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही.  अपीलकारास डावलून श्रीमती.भिडे यांना सचिव पदावर पदोन्नती देण्यात आली असल्याने अपीलकारास का डावलण्यात आले याबाबतची माहिती तसेच पदोन्नती समितीच्या इतिवृत्ताची प्रत, श्रीमती.सुराणा यांच्या निवडीच्या प्रकरणास जबाबदार असणा-या अधिका-याविरुध्द ACB कडे FIR दाखल केली असल्यास त्याची प्रत, श्रीमती.भिडे यांनी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिल्याची तारिख व त्यांची स्वेच्छनिवृत्ती मंजूर आदेशाची प्रत

अपीलकाराने मागीतलेली आहे. माहिती उपलब्ध नाही, भाष्य करणे अभिप्रेत नाही अशी लंगडी कारणे देउन अपीलकारास माहिती नाकरणे निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करून द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१९५३/०२**

**श्री.निलकंठ जनार्दन सावंत**
**२६९, अनुसया, जवाहर नगर,**
**जैन मंदिरा समोर, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०६२.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**मा.धर्मादाय उप आयुक्त, मा.धर्मादाय आयुक्त**
**यांचे कार्यालय, २ रा मजला, डॉ.ॲनी बेझंट मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई,**
**मा.धर्मादाय उप आयुक्त, मा.धर्मादाय आयुक्त**
**यांचे कार्यालय, २ रा मजला, डॉ.ॲनी बेझंट मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.निलकंठ सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०७.२००८ रोजी अर्ज करुन बाल शिक्षण मंदिर ट्रस्ट या संस्थेच्या बँक खात्यातील पैसे काढण्यापूर्वी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार धर्मादाय आयुक्त यांच्याकडून संस्थेला किती खर्च आवश्यक असून, ते धर्मादाय आयुक्तांना सादर करुन त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे व जेवढी परवानगी असेल तेवढीच रक्कम बँकेतून काढणे बंधनकारक आहे. अशी परवानगी आजतागायत किती वेळा देण्यात आली या बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.१७.०७.२००८ रोजी अर्ज करुन बाल शिक्षण मंदिर ट्रस्ट या संस्थेच्या बँक खात्यातील पैसे काढण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. मुद्‌दा क्र.१ नुसार श्री.अलकनंदा राणे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार कार्यालयाकडे बँकेतील रक्कम काढण्याबाबत अर्ज केला नव्हता. मुध्दा क्र.२ प्रमाणे हिशोबपत्रकाबाबत अनुसूची १० ची प्रत अपीलकारास देण्यात आली आहे. मुध्दा क्र.३ अनुसार प्रलंबित बदल अर्ज निकाली काढण्यासंबंधी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना मुदतवाढी संदर्भात जे विनंती पत्र देण्यात आले आहे, त्याची प्रतही अपीलकारास देण्यात आली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. परंतू अपीलकारास दिलेल्या माहितीची प्रत अहवालासोबत आयोगास सादर केली नाही. यावरुन अपीलकारास माहिती दिल्याची खात्री होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३०.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१२५९/०२**

**श्री.शिरीष गोतेच्छा**
**अध्यक्ष-मालाड व्यापारी संघ**
**३, गोतेच्छा इस्टेट, साईनाथ रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, विस्तारीत इमारत,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, कांदिवली,**
**मुंबई ४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी (प),**
**मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.शिरीष गोटेच्छा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०२.२००८ रोजी अर्ज करून सीटी सर्व्हे क्रे.६०८, ६१० व ६११ जवळील स्टेशन रोडवरील आर.एल. च्या विसंगतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.२५.०२.२००९

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०२.२००८ रोजी अर्ज करुन सीटी सर्व्हे क्र.६०८, ६१० व ६११ जवळील स्टेशनरोडवरील आर.एल.च्या विसंगतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  या परिस्थितीत मी आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०३.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१५/०२**

**श्री.ओमप्रकाश पुनराज गुप्ता**
**३३५/१०, रामजीवन भैय्या चाळ,**
**ठक्कर तबेला जवळ, रा.स.मार्ग,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०९७.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.ओमप्रकाश गुप्ता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.१२.२००७ रोजी अर्ज करुन सर्व्हे क्र.२८४, सी.टी.एस.क्र.५०२ (पीटी) ५०२/३२५ ते ३३३, ५१०, ५१२, ५१३, ५१५ व ५१६ व्हीलेज मालाड (पू) धनजीवाडी, मुंबई बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागीतलेली माहिती ही मोठया स्वरुपाची व अस्पष्ट असल्यामुळे उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व सामग्रीचे निरीक्षण करावे. त्यानंतर सूचित केलेली माहिती विहित शुल्क आकारुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मागीतली आहे. निरीक्षण मागीतलेले नाही. असे नमुद करुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१८.०२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. विहित कालावधीत माहिती

दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते.  अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यता आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.१२.२००७ रोजी अर्ज करुन व्हीलेज मालाड (पू), धनजीवाडी, मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील संस्थाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  क्र.२८४, सी.टी.एस.क्र.२८४, ५०२, (पीटी) ५०२/३२५ ते ३३३, ५१०, ५१३, ५१५, ५१६ व्हीलेज मालाड (पू), मुंबई या जागेवरील संस्थासंबंधीची कागदपत्राची मागणी केली होती.  त्यानुसार दि.०२.०७.२००८ च्या पत्रासोबत १०१ पानाच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात आल्या असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  यावरुन अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते.  अपीलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.  जन माहिती अधिका-यांनी आवश्यक माहिती पुरविली असल्याने सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०१९/०२**

**श्री.एन.कनकराज**
**शरद अपार्टमेंट को.ऑ.हौ.सोसा,**
**टिळक नगर, ६ वा मजला, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०६२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय,**
**मिठा नगर, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय,**
**मिठा नगर, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० ०६२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.एन.कनकराज यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०७.२००८ रोजी अर्ज करुन शरद अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था लि. टिळक नगर, गोरेगांव (प), मुंबई येथील इमारतीमधील सदनिका क्र.१७ अवैद्यरित्या बांधकाम करत असल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.०८.२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, अवैद्यरित्या बांधकाम करणा-या सदनिकाधारकास म.न.पा.अधिनियम कलम ३५१ अनुसार नोटीस देण्यात आली आहे. यासंबंधीच्या पत्रव्यवहाराच्या प्रती विहित शुल्क भरुन प्रती प्राप्त करुन घेता येईल. प्रश्नोत्तरा संबंधीची माहिती उक्त अधिनियम २००५ च्या कार्यकक्षेत येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय

प्राधिका-याकडे दि.२२.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१०.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील निकालात काढले. सदनिका धारकाविरुध्द काढलेल्या नोटीसीची प्रत मिळाली परंतू सदनिकाधारकाविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल प्राप्त झाला नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने सदनिका क्र.१७ मध्ये अवैद्यरित्या बांधकाम केल्याबाबत तक्रार केली होती. अपीलकाराच्या तक्रारीस अनुसरुन सदनिकाधारकाविरुध्द नोटीस काढण्यांत आली. नोटीसीची छायाप्रत अपीलकारास देण्यात आली. परंतू नोटीसीनुसार पुढे केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास देण्यात आली नाही असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## <u>आदेश</u>

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२३/०२**

**डॉ.कन्नमा सुंदरा रमन**
**३०४, राजहंस अपार्टमेंट,**
**लेन नं.३, सुंदर नगर,**
**कालीना, मुंबई ४०० ०९८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार डॉ.कन्नमा रमन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०७.२००८ रोजी अर्ज करुन फाउंडेशन दिनानिमित्त दि.१८.०७.२००७ रोजी शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती देण्याची कारवाई सुरु असून थोडयाच कालावधीत अपीलकारास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०८.२००८ रोजी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०७.२००८ रोजी अर्ज करुन मुंबई विद्यापीठाने फाउंडेशन दिनानिमित्त दि.१८.०७.२००७ रोजी शिक्षकांना देण्यात आलेल्या पुरस्काराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**
**दिनांक ३१.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१८१८/०२**

**श्री.विजय के.चव्हाण**
**२ ए, सन आणि सी अपार्टमेंट,**
**रॉयल लेन जवळ, जुहूतारा रोड,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०४९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम वॉर्ड ऑफिस इमारत,**
**पालीराम पथ, एस व्ही रोड विरूध्द,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम वॉर्ड ऑफिस इमारत,**
**पालीराम पथ, एस व्ही रोड विरूध्द,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.विजय के.चौहाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०७.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०५.२००७ रोजी अर्ज करुन सन आणि सी अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था, जुहूतारा रोड, रॉयल लेन जवळ, मुंबई या संस्थेतील सदनिका क्र.२/ए चा निवासी ऐवजी व्यापारी तत्वावर वापर करत असल्याबाबत तसेच अनधीकृतरित्या ओटला बांधकामबाबत केलेल्या तक्रारीस अनुसरुन केलेल्या कारवाई / सद्यस्थितीची माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. असंबंध (irrelevant) माहिती दिल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर

अपीलावर दि.०४.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकारा हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०३.०५.२००७ रोजी अर्ज करुन सदनिका क्र.२/ए चा निवासी ऐवजी व्यापारी तत्वावर वापर होत असल्याबाबत तसेच ओटल्याच्या अनधीकृत बांधकामासंबंधी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची / सद्यस्थितीची माहिती मागीतली होती. सदनिका धारकांनी निवासी ऐवजी व्यापारीतत्त्वावर २/ए या सदनिकेच्या वापराबाबत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतलेली नाही. एम.आर.टी.पी कलम ५३(१) अन्वये सदनिका क्र.२/ए च्या मालकास नोटीस काढण्यात येत असल्याबाबत कळविले. निवासी सदनिकेचा अनधिकृतपणे व्यापारी तत्वावर सदनिकाधारक वापर करत असून ओटयाचे अनधीकृतपणे बांधकाम केले असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणाच्यावेळी निदर्शनास आले असूनही सदनिकाधारकाविरुध्द उचित कारवाई केल्याचे दिसून येत नाही. अपीलकारास याबाबत माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी अपीलकाराच्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०१७/०२**

**श्री.जी.आर.दालमिया**
**सी-१५, क्रिष्णालया,**
**४ था मजला, सायन दुनकॅन रोड,**
**चुनाभट्टी बस डेपो जवळ,**
**मुंबई ४०० ०२२.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**निबंधकाचे कार्यालय,**
**एस.एन.डी.टी. विद्यापीठ,**
**पी.जी.विभाग संगणक विज्ञान,**
**चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.**

**जन माहिती अधिकारी,**
**निबंधकाचे कार्यालय,**
**एस.एन.डी.टी. विद्यापीठ,**
**पी.जी.विभाग संगणक विज्ञान,**
**चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.जी.दाडमिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०७.२००७ रोजी अर्ज करून प्राजेक्टर आणि पी.ए.सीस्टीम्सच्या निवीदा चौकशीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकारान प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०५.०९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येतो की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन प्रोजेक्टर आणि पी.ए.सीस्टीम्सच्या निवीदा चौकशीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२०/०२**

**श्री.जगन्नाथ एच.शर्मा,**
**चंद्रीकाबाई एच. शर्मा,**
**चाळ रुम नं.१ आणि २,**
**खार जवाहर नगर, साईबाबा रोड,**
**खार (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.जगन्नाथ शर्मा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जमीन मालकाच्या परवानगीशिवाय एस.आर.ए.योजना लागू होते का? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.१५.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. परंतू सदर प्रकरणी सुनावणी देण्यात आली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आणि सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन साईबाबा रोड जवाहरनगर, खार (पू), मुंबई येथील अपीलकाराची मालमत्ता पूर्व परवानगी न घेता झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत विकासाकरिता घेतल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. साईबाबा रोड जवाहरनगर एच/ई विभाग क्र.६५९७ (३), (४), (५), (६) येथील मालमत्तेचा महानगरपालिकेचा कर प्रलंबित असल्याबाबत वसूलीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने जप्तीची नोटीस श्रीमती.चंद्रीकाबाई हुबला शर्मा यांना नोटीस पाठविली होती. महानगरपालिका कराची प्रलंबित रक्कम भरण्याबाबत तसेच मालमत्ता परत मिळवावयाची असल्यास जाहिररित्या मालमत्ता विक्रीबाबत जाहिरात देउन सुरु केलेल्या कार्यपध्दतीपोटीचा खर्च रु.१८००/- इतका भरणा करावा असे कळविण्यात आले होते असे अपीलकाराच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना मालकाच्या परवानगीशिवाय कशी लागू केली. अपीलकाराची खाजगी मालमत्ता होती. गलीच्छवस्ती म्हणून जाहिर केलेली नव्हती. याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली आहे. न.भु.क्र.५६, १५३, १५४, १५५, ६२/५, ६५/६ या जमिनीवरील झोपडपट्टी गलिच्छ वस्ती म्हणून घोषित केलेली होती. त्यानुसार या झोपडपट्टीत झोपडी गणना २००० नुसार ओळखपत्रे देण्यात आली होती. महाराष्ट्र स्लम ट्रॅब्युनल, मुंबई यांच्याकडिल अपील क्र.२६२/९१ दि.८ जून, १९९२ व ७१/९२ दि.७ जुर्ले, १९९५ अन्वये झोपडपट्टी स्लममधून वगळण्यात आली. तथापि सदर माहिती कार्यालयास कळविण्यात आलेली नसल्याने त्याची नोंद रजिस्टरमध्ये नाही. ओळखपत्रे रद्द करण्याची कार्यवाही चालू करण्यात आली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. परंतू सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती विहित कालावधीत दिली नसल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यकते

आदेश पारित करावेत.  यामुळे समाधान झाले नाही तर राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२४/०२**

**डॉ.कन्नमा सुंदरा रमन**
**३०४, राजहंस अपार्टमेंट,**
**लेन नं.३, सुंदर नगर,**
**कालीना, मुंबई ४०० ०९८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुंबई विद्यापीठ,**
**फोर्ट, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार डॉ.कन्नमा रमन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०७.२००८ रोजी अर्ज करुन रीडर पदावरुन प्रोफेसन पदावरील पदोन्नतीकरिता Career Advancement Scheme अंतर्गत केलेल्या अर्जाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०८.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी मोघम / अस्पष्ट माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकारा हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे दि.०५.०७.२००८ रोजी अर्ज करुन Career Advancement Scheme अंतर्गत केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जेष्ठ प्राद्यापकांच्या छानणी समितीमार्फत रीडर पदावरुन प्राद्यापक पदावरील पदोन्नती प्रस्तावाची विद्यापीठ अनुदान आयेग (U.G.C.) आयोगाच्या शर्ती / अटीनुसार तपासणीकरुन निर्णय घेण्यात येतो असे अपीलकारास कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. मुध्दा क्र.३ (I) ४ (II) (III) बाबत जन माहिती अधिका-यांनी फार मोघम स्वरुपाची माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलाती मुध्दा उपस्थित केली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, रीडर पदावरुन प्रोफेसर पदावर Career Advancement Scheme अंतर्गत अर्ज केलेल्या शिक्षकंाचेबाबत समितीने / कार्यालयाने केलेल्या कार्यवाही संबंधीची सर्व संबंधीत धारिका / कागदपत्र तपासणीकरिता जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी. त्यानंतर मागणीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२२/०२**

**श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळा, श्री.महावीर प्रसार सैनी,**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. निबंधक**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळा, महावीर प्रसाद सैनि यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००८ रोजी अर्ज करुन अपीलकाराने दि.२४.०३.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कादपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन दि.२४.०३.२००८ च्या तक्रार अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, १) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजन) २) डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजन) या दोन नोंदणी न झालेल्या गृहनिर्माण संस्थांची नोंदणी (Registration) झाली किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास द्यावी.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई**<br>
**दिनांक ३०.०३.२००९**

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२७/०२**

**श्री.मुरलीधर पुनवासी मल्लाह**
**रामविलास चाळ, म्हात्रे कंपाउंड,**
**कार्टर रोड नं.१, बोरीवली (पू),**
**मुंबई ४०० ०६६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**आर/मध्य वॉर्ड ऑफिस इमारत,**
**महापालिका मंडई इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड, बोरिवली (प),**
**मुंबई ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (परिक्षण)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**आर/मध्य वॉर्ड ऑफिस इमारत,**
**महापालिका मंडई इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड, बोरिवली (प),**
**मुंबई ४०० ०९२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.मुरलीधर मल्लाह यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.१०.२००८ रोजी अर्ज करुन सन १९८० पूर्वीची म्हात्रे कंपाउंड, रामविलास चाळ, बोरीवली (पू) येथील निवासी झोपड्डी पाडल्याबद्दल पर्यायी जागा मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकारास सदरप्रकरणी दि.२५.०१.२००४ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे दि.२९.०९.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर

अपीलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकाराने दि.१७.०३.१९८९ रोजी पाठविलेले पत्र तहसील कार्यालयाचे पत्र अभिलेखावर उपलब्ध नाही. श्री.मल्लाह यांचे झोपडे दि.०७.११.१९८७ रोजी निष्कासित केले होते. अपीलकारास पर्यायी जागा मिळण्यास विचार करता येत नाही असे नमूद करुन दि.३१.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन निष्कासित केलेल्या झोपडयाच्या बदली पर्यायी जागा मिळण्याबाबत मागणी केली होती. अपीलकाराचे म्हात्रे कंपाउंड, बोरीवली (पू) येथील झोपडे दि.०७.११.१९८७ रोजी प्रचलीत धोरणानुसार निष्कासित केले होते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत अपीलकाराच्या नावाचा परिशिष्ट-२ मध्ये समावेश करावा अशी अपीलकाराची मागणी आहे. याबाबत अपीलकाराने यापूर्वी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने (अपील क्र.७८२) आदेश पारित केले आहेत. प्रचलीत नियमानुसार तपासणी करुन अपीलकाराच्या नावाचा परिशिष्ट-२ मध्ये समावेश करण्याबाबत पुनविचार करावा असे आदेशीत केले होते. त्यास अनुसरुन अपीलकराच्या नावाचा परिशिष्ट-२ मध्ये समावेश करता येत नसल्याचे सहाय्यक आयुक्तांनी दि.१०.११.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविलेले आहे. अपीलकाराची सदर मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नसल्याने सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०२१/०२**

**श्री.दत्तात्रय शिवराम चव्हाण**
**१२९/६, धनश्री-ए, ले.दिलीप गुप्ते रोड,**
**माहिम, मुंबई ४०० ०१६.** .... अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**लोकमान्य टिळक मार्ग, बेस्ट उपक्रम, दादर (पू),**
**परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**मुंबई ४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (परिक्षण)**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**लोकमान्य टिळक मार्ग, बेस्ट उपक्रम, दादर (पू),**
**परिवहन अभियांत्रिकी इमारत,**
**मुंबई ४०० ०१४.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अर्जदार श्री.दत्तात्रय चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०४.२००८ रोजी अर्ज करुन विजमापकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविले की, दि.२४.०७.२००८ च्या पत्रानुसार अपीलकारास सविस्तर माहिती कळविली आहे. नवीन विद्यूत मिटर्स टेस्ट करुनच ग्राहकाच्या सेवेसाठी लावले जातात. बेस्ट उपक्रम यासंबंधी योग्य ती काळजी व शहानिशा केल्यानंतरच विद्युत मिटर्स ग्राहकासाठी उपलब्ध करुन देते. जी उत्तर / विभाग अधिका-याकडे समक्ष भेटून कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्राची पडताळणी करावी. त्यानंतर हव्या असलेल्या कागदपत्राची सत्यप्रत व विद्युत मीटर टेस्ट रिपोर्ट देणे शक्य होईल असे अपीलकारास कळविले. अपीलकारास कागदपत्राची पडताळणी करण्याकरिता येणे शक्य नसेल तर, संपूर्ण पत्रबंधात एकूण २४

कागदपत्रे आहेत. त्यासाठी प्रती प्रत रु.२ प्रमाणे रक्कम रु.४८/- भरणा पावती दाखविल्यानंतर दस्तऐवज आपणास सुपूर्द करण्यात येतील असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२४.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविले.

मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे दि.२१.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विद्युत मीटर टेस्ट रिपोर्टसाठी रु.५०/- इतक्या रक्कमेचा भरणा करावा कार्यालयातील कागदपत्राची समक्ष येउन पडताळणी करावी. त्यानंतर विहित शुल्क आकारुन कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०५.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन विद्युत मीटरबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. आवश्यक माहितीसाठी कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्राची पडताळणी करावी. हे शक्य नसल्यास रु.४८/- रक्कमेचा शुल्कापोटी भरणा करावा व माहिती प्राप्त करुन द्यावी. विद्युत मिटरच्या टेस्ट रिपोर्टकरिता रु.५०/- चा भरणा करावा असे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले असल्याचे दिसते. परंतू अपीलकाराने विहित शुल्क भरल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने माहिती पोटी विहित शुल्क भरावे. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.०३.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/१५५८/०२**

**श्री. विपुल धरोड,**
**७३/३, गुरुकृपा,**
**सायन (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.** **------अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका (मालमत्ता विभाग),**
**दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्केट,**
**फलटण रोड, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**आस्थापना अधिकारी, (मालमत्ता विभाग),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका (मालमत्ता विभाग),**
**दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्केट,**
**फलटण रोड, मुंबई-४०० ००१.** **-------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विपुल धराडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मालमत्ता विभाग), छत्रपती शिवाजी महाराज मार्केट, मुंबई, यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सायन कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. १२६, भंडारवाडा, सायन (पूर्व), मुंबईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१६.१.२००८ च्या पत्राने लीज ॲग्रीमेंट तसेच दि.२४.८.१९९५ च्या पत्राच्या प्रतीकरिता रु.१५०/-एवढे शुल्क कार्यालयात भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरीक्षण करण्याबाबत अपिलकारास कळविले. विहित कालावधीत संयुक्तिक माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.५.१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मालमत्ता विभाग), छत्रपती शिवाजी महाराज मार्केट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सायन कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. १२६, भंडारवाडा, सायन (पूर्व), मुंबईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही. सदर प्रकरणी अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१२.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.०१.२००८ रोजी पाठविलेल्या पत्रातील माहिती विना मुल्य उपलब्ध करून द्यावी तसेच माहितीचा अधिकार अधिनियमार्तगत विहित मुदतीत माहिती न दिल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कलम २० अन्वये आपणावर दंडात्मक कारवाई का करण्यात येउ नये याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी हे आदेश मिळताच ३ आठवडयात आयोगात सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांकः- ०९/०३/२००९.**